# गहाळ, चोरीस गेलेल्या १२७६ पैकी २८४ मोबाईलचा पोलिसांकडून छडा

■ सायबर पोलिसांची वर्षभरातील कामगिरी

■ सापडलेल्यापैकी ३० मोबाईल केले मालकांना परत



**धाराशिव :** केंद्र सरकारच्या दुरसंचार व दळणवळण विभागाने हरवलेल्या अथवा चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी सीईआयआर हे ऑनलाईन पोर्टल सुरु केले आहे. सदरचे पोर्टल धाराशिव जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आले असुन फिर्यादी स्वतः आपली मोबाईल हरवल्याची तक्रार या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने नोंदवू शकतात. दरम्यान, मागील वर्षभरात जिल्हाभरातून १२७६ मोबाईल हरवले अथवा चोरीस गेल्याबाबतच्या तक्रारी पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. यापैकी २८४ मोबाईल शोधून काढण्यात पोलिसांना यश आले असून यापैकी सायबर पोलिसांनी ३० मोबाईल खातरजमा करून मुळ मालकांना पोलीस अधीक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या हस्ते परत करण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यातील हद्दीमध्ये सन २०२३-२४ मध्ये चोरीस गेलेल्या, हरवलेल्या मोबाईलच्या एकुण १२७६ तक्रारी पोलिसांनी सीइआयआर या पोर्टलवर अपलोड केल्या होत्या. त्यापैकी एकुण २८४ मोबाईल ज्यांची किंमत ५६,८०,४३१ रुपये शोधून काढण्यात धाराशिव पोलिसांना यश आले आहे. त्यापैकी सायबर पोलीस ठाण्याने शोधलेले एकुण ३० मोबाईल हे बुधवारी (दि.१८) पोलीस अधीक्षक संजय जाधव व अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या हस्ते फिर्यादींना परत करण्यात आले. त्यावेळी हरवलेले मोबाईल परत मिळाल्यामुळे फिर्यादींनी पोलिसांचे आभार मानुन समाधान व्यक्त केले आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. जाधव, अपर पोलीस अधीक्षक श्री. हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश कासुळे, पोलीस हावलदार- कुलकर्णी, हालसे, नाईकवाडी, महिला पोलीस नाईक- पौळ, पोलीस अमंलदार-जाधवर, भोसले, मोरे, भोसले, तिळगुळे, कदम, काझी, सुर्यवंशी, महिला पोलीस अंमलदार- खांडेकर, शेख यांच्या पथकाने केली आहे.

### नागरीकांनीही सीइआयआर पोर्टलचा लाभ घ्यावा

धाराशिव पोलीस दलातर्फे यानिमित्ताने आवाहन करण्यात आले आहे की, मोबाईल चोरी झाला किंवा हरवला तर जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करावी. त्यांनतर केंद्र सरकारच्या दुरसंचार व दळणवळण विभागाने सुरु केलेल्या सीईआयआर या वेबसाईटवर पोलीस ठाण्याची फिर्याद व स्वतःचे आधार कार्ड अपलोड करुन ऑनलाईन तक्रार नोंद करावी किंवा सायबर पोलीस ठाणे धाराशिव येथे संपर्क करावा. ज्यामुळे सदरील मोबाईलचा शोध घेणे सोयीचे होईल असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.